**सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व्यासपीठ स्थिरता प्रमाणपत्र देण्यासाठी संगणकीय कार्यपध्दती अवलंबिण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्र.बीडीजी-२०२०/प्र.क्र.४६/इमा-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ .१०.२०२०

**प्रस्तावना :-**

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे विविध शासकीय विभागाच्या कार्यक्रमांकरीता बांधण्यात आलेल्या व्यासपीठांची स्थिरता प्रमाणपत्र देण्यात येते. तथापि, असे आढळून आले आहे की, सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रम आयोजित करीत असतांना, आयोजक रितसर प्रचलित पध्दतीने सर्व संबंधित विभागाची मुख्यत्वे करुन पोलीस विभागाची परवानगी घेत नाही. तसेच कार्यक्रमाला सुरुवात होतांना काही तासांचा अवधी शिल्लक असतांना, कार्यक्रम सुरु झाल्यानंतर अथवा कार्यक्रम झाल्यानंतर परवानगीसाठी अर्ज सादर करतात. या उपरोक्त आदरातिथ्य उद्योगामध्येही काही वेळा व्यासपीठ स्थिरता प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता भासते.

वरील सर्व बाबी लक्षात घेऊन ऑनलाईन पध्दतीने व्यासपीठ स्थिरतेबाबत परवानगी देण्याच्या प्रचलित पध्दतीत सुधारणा करुन ऑनलाईन पध्दतीने परवानगी देण्याची संपूर्ण प्रक्रिया राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानुषंगाने प्रचलित पध्दतीत बदल करुन कागदपत्राचा अनावश्यक वापर टाळण्यासाठी Web based stage stability Certificate प्रणाली विकसीत करुन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे व्यासपीठ स्थिरताबाबत देण्यात येणारी परवानगी ऑनलाईन पध्दतीने कार्यान्वीत करण्याकरीता आता खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे व्यासपीठ स्थिरताबाबत देण्यात येणारी परवानगी ऑनलाईन पध्दतीने करण्याकरिता stage stability certificate संगणक कार्यप्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर ऑनलाईन संगणक प्रणाली ही सार्वजनकि बांधकाम विभागाच्या (www.mahapwd.com) या संकेतस्थळावर ePermission अंतर्गत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. सदरहू संगणकीय कार्यप्रणालीमध्ये खालील प्रमाणे महत्वाच्या बाबी राहतील.

१) विभागाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे विविध कार्यक्रमांकरीता व्यासपीठ स्थिरताबाबत ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा.

२) अर्जदार व संबंधित कार्यकारी अभियंता यांची संयुक्तरित्या प्रत्यक्ष जागेची पाहणी व व्यासपीठ स्थिरता तपासणीकरीता संयुक्त कार्यवाही.

३) जागेची प्रत्यक्ष पाहणी नंतर ई-परवानगी चे पत्र कार्यकारी अभियंता स्तरावरुन अर्जदारास प्रदान करणे.

४) अशा प्रकारे परवानगी दिलेल्या सर्व प्रकरणांच्या माहितीचे संकलन विविध स्तरावर करणे.

५) कार्यप्रणालीत Barcoding, Unique नंबर ने अंकीत केलेले परवानगी प्रमाणपत्र.

२. सदरहू संगणकीय कार्यप्रणालीव्दारे ऑनलाईन अर्ज अर्जदारास संकेतस्थळावर नि:शुल्क उपलब्ध असेल.

३. ऑनलाईन परवानगी प्रक्रियामध्ये अर्जदार सर्वप्रथम ऑनलाईन अर्ज जिल्हानिहाय सार्वजनिक बांधकाम मंडळाकडे सादर करेल. त्या अनुषंगाने संबंधित अधीक्षक अभियंता प्रस्तुत अर्ज संबंधित कार्यकारी अभियंत्याकडे पाठवतील. कार्यकारी अभियंता अर्जदार किंवा त्याचा प्रतिनिधी यांचे समवेत प्रत्यक्ष जागेची पाहणी करतील, अर्जास ऑनलाईन मंजूरी देतील, तदनंतर संबंधित कार्यकारी अभियंता e-permission प्रदान करतील. अर्जदारासमवेत करारनामा करावयाची आवश्यकता असल्यास ती कार्यवाही तदनंतर विहीत कालावधीत पूर्ण करण्यात यावी.

४. सदर stage stability certificate प्रणाली अंतर्गत खालीलप्रमाणे विविध Log-in राहतील.

अ. अर्जदार (पोलीस खाते)

ब. अधीक्षक अभियंता

क. संबंधित कार्यकारी अभियंता

ड. Administrative Rights चे Login मुख्य अभियंता कार्यालयाअंतर्गत ITCC Nagpur.

५. सदर प्रणालीचा वापर दि. १.११.२०२० पासून बंधनकारक राहील.

६. सदरहू संगणकीय कार्यप्रणाली मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या अधिपत्याखाली नागपूर येथील माहिती व तंत्रज्ञान समन्वय केंद्र (आयटीसीसी) मध्ये विकसित करण्यात आलेली असून मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर हे सह समन्वयक आणि सचिव (बांधकामे) हे प्रमुख समन्वयक असतील.

७. Stage stability प्रक्रियेमध्ये कुठलेही वादविवाद अथवा तंटा, भांडणे उद्भविल्यास संबंधित अधीक्षक अभियंता यांचा निर्णय अंतिम असेल.

८. अर्जदाराकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधीक्षक अभियंता यानी कार्यक्षेत्रानुसार संबंधित कार्यकारी अभियंता याना ऑनलाईन पाठवावे. कार्यकारी अभियंता यानी अर्जदार अथवा त्यांचा प्रतिनिधी समवेत संयुक्त पाहणी पूर्ण करावी. कार्यकारी अभियंता यानी दोन शासकीय दिवसात ऑनलाईन मंजूरी दयावी. Stage stability certificate पत्र त्याच दिवशी ऑनलाईन दयावे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२०१०१३११२९११६४१८ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SACHIN MANIKRAO CHIVATE

Digitally signed by SACHIN MANIKRAO CHIVATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=PUBLIC WORKS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=643026ceca9d6dc21fa6c4525f6fd9fbdfc59a9a42af9ca3066f28a4b58ad630, cn=SACHIN MANIKRAO CHIVATE
Date: 2020.10.13 11:32:01 +05'30'

**( सचिन चिवटे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
२. मुंबई,पुणे,नागपूर,औरंगाबाद,नाशिक,अमरावती
३. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई.
४. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई.
५. सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यासन इमारती-१ मंत्रालय, मुंबई.